www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १२१ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.२९ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

# ओबीसींच्या तोंडचा घास काढला जातोय

# भुजबळांचा सरकारला घरचा आहेर

## १ रोजी 'सरकार घेरो' तर ३ रोजी 'एल्गार मोर्चा'; मागास आयोग बरखास्त करण्याची मागणी

**मुंबई**–राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत नोटिफिकेशन्स काढल्याने राज्याचे मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ नाराज झाले आहेत. सरकारच्या निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का बसणार असल्याने छगन भुजबळ यांनी पुढील रणनीती ठरवण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी बैठकीचे आयोजन करण्यात आलेली बैठक नुकतीच संपली. त्यानंतर छगन भुजबळ यांनी मार्गदर्शन केले.

भुजबळ म्हणाले की, मराठा समाजाला आमचा कोणाचाही विरोध नव्हता. ज्यांच्या नोंदी आहेत. त्यांना कुणबी दाखले दिले जातील, तोपर्यंत ठीक आहे. परंतू यातून ओबीसी समाजाच्या आरक्षण हिसकावण्याचे काम सुरू झाले आहे. ओबीसींच्या तोंडचा घास काढून घेतला जातोय. ओबीसींवर अन्याय केला जातोय, तो सरकारने थांबवला पाहिजे, असे मंत्री छगन भुजबळ म्हणाले.

केवळ मला सुरुवातीच्या एकाच निर्णयात विश्वासात घेतलं त्यानंतर मला कोणत्याही निर्णयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्वासात घेतलं नाही. मी केवळ मागचा काही दिवसांपासून जे निर्णय घेतले जात आहे ते पाहत असल्याचे त्यांनी म्हटले. ओबीसी समुदायात बॅकडोअर एन्ट्री करण्याचे काम सध्या सुरू आहे. ओबीसी समाजाला धक्का लागणार नाहीं असं सांगण्यात येत आहे. प्रत्यक्षात मात्र बॅक डोअर एंट्री सुरू झाली असल्याचे त्यांनी म्हटले.भुजबळ म्हणाले की, भारतीय संविधानातील आर्टिकल ३३८ ब प्रमाणे निकालाच्या आधारे संबंधित जाती घटकाबाबत आसक्ती नसलेले सदस्य कोणत्याही आयोगात नियुक्त करणे अपेक्षित असताना न्यायामूर्ती सुनील सुक्रे, ओमप्रकाश जाधव, प्रा. अंबादास मोहिते या मराठा आरक्षण विषयावर आसक्ती असलेल्या सदस्यांची आयोगावर बेकायदेपणे नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर मागासवर्ग आयोगाचे सदस्य हे इंदिरा सहानी खटल्याप्रमाणे संबंधित जातीची आसक्ती असणारे नसावेत असे अपेक्षित असताना मागासवर्ग आयोगाचे नवनियुक्त अध्यक्ष सुनील सुक्रे हे मराठा समाजाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यामुळे राज्यमागासवर्ग आयोग आणि शिंदे समिती रद्द करण्यात यावी, अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली आहे.आयोगावर कोणत्याही जातीची आसक्ती असलेला सदस्य नसावा अशी अपेक्षा आहे. कोणत्याही जातीशी जवळीक नसलेले लोक आयोगात असावेत. पण सुनील सुक्रे साहेब तर आयोगात असूनही उपोषण सोडायला गेले. मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून त्यासाठी न्यायामूर्तींची जी समिती स्थापन झाली. त्यातही सुक्रे आहेत. सुक्रे हे एका समाजाच्या बाजूने झुकले आहेत. ते आयोगाचे अध्यक्ष आहेत. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा त्यांचा एकमेव कार्यक्रम आहे, असं भुजबळ यांनी सांगितलं.दरम्यान, छगन भुजबळ यांनी आता सरकारला घेरण्याचा इशारा दिला आहे. त्यासाठी त्यांनी काही कार्यक्रमही दिला आहे. येत्या १ तारखेला तुमच्या मतदारसंघातील आमदार, खासदार आणि तहसीलदरांकडे हजारोंच्या संख्येने जाऊन तुमचे म्हणणे मांडा. ओबीसींनो, घरातून बाहेर पडा. आता घरात बसू नका, असं आवाहन भुजबळ यांनी केलं आहे.येत्या ३ फेब्रुवारी रोजी नगरमध्ये एल्गार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित राहा, असं आवाहन त्यांनी केलं आहे. तसेच वकील, विचारवंत आणि लेखकांनी बाहेर पडावं. आपलं म्हणणं मांडावं. वकिलांनी कोर्टात जाऊन आपली बाजू मांडावी, असं आवाहनही यावेळी करण्यात आलं आहे.मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, सरकारच्या वतीने ज्या पद्धतीने आरक्षणाबाबतची अधिसूचना काढली आहे. त्यावर १६ फेब्रुवारी पर्यंत संपूर्ण ओबीसी समाजबांधवांनी लाखो हरकती



पाठवाव्यात. ओबीसींवर कसा अन्याय होणार आहे, हे यातून स्पष्ट सरकारच्या निदर्शनात मांडावे, जेणेकरून हा विषय लक्षात येईल, नाहीतर तुमच्या मुलाबाळांचे भविष्य धोक्यात आहे, हे ही लोकांनी समजून घेणे गरजेचे आहे, असे छगन भुजबल यांनी आवाहन केले आहे.शासनाच्या वतीने मागास वर्ग आयोगातील पूर्वीच्या लोकांना योग्य रित्या काढल्या गेले. व मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण कसे दिले जाईल, या अनुषंगाने सोईचे माणसं नेमली गेली की काय अशी शंका यायला लागली आहे, असे मंत्री भुजबळ म्हणाले. आमचा शिंदे समितीला विरोध आहे. असंवैधानिक पद्धतीने ही समिती काम करत आहे. त्यामुळे ती ताबडतोब बरखास्त केली जावी, अशी मागणी भुजबळ यांनी केली.

ठराव क्र.१ : महाराष्ट्र शासनाने मराठा आरक्षणा संदर्भात सगेसोयरे या शब्दाची व्याख्या बदलून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब दिनांक २६ जानेवारी २०२४ नुसार मसूदा काढला आहे. यामुळे ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आपला हा निर्णय मूळ ओबीसीवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे २६ जानेवारी २०२४ च्या राजपत्राचा मसूदा रद्द करण्यात यावा.

ठराव क्र.२ : महाराष्ट्र सरकार नियुक्त न्या. संदीप शिंदे समिती ही असंविधानी असून, मागासवर्ग आयोग नसताना मराठा - कुणबी / कुणबी - मराठा जात नोंदींचा शोध घेऊन कोणत्याही मागासवर्ग आयोगाने (राज्य किंवा राष्ट्रीय आयोग) मराठा समाजाला मागास ठरविलेले नसताना समितीच्या शिफारशीवरून प्रशासनाकडून मराठा कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण केले जात आहे. सदर मराठा - कुणबी / कुणबी - मराठा प्रमाणपत्रांचे वितरणाला स्थगिती देण्यात यावी.

ठराव क्र. ३ : भारतीय संविधानातील आर्टिकल ३३८ (ब) प्रमाणे उपरोक्त निकालाच्या आधारे संबंधित जाती घटकाबाबत आसक्ती नसलेले (CONFLICT OF INTEREST) सदस्य नियुक्त करणे अपेक्षित असताना मा. न्या. सुनील सुक्रे, ओमप्रकाश जाधव, प्रा. अंबादास मोहिते या मराठा आरक्षण या विषयाबाबत आसक्ती असलेल्या व्यक्तींचा मागासवर्ग आयोगावर बेकायदेशीर पध्दतीने नियुक्त्या केल्या.

त्याचबरोबर मागासवर्ग आयोगाचे सदस्य आणि अध्यक्ष हे इंदिरा सहानी खटल्यातील निकालाप्रमाणे संबंधित जातीशी आसक्ती असलेले नसावेत असे अपेक्षित असताना मागासवर्ग आयोगाचे नवनियुक्त अध्यक्ष सुनील सुक्रे हे मराठा समाजाचे सक्रिय (Activist) कार्यकर्ते आहेत. त्यामुळे राज्य मागासवर्ग आयोग व न्यायमुर्ती शिंदे समिती रद्द करण्यात यावी असे तीन ठराव यावेळी करण्यात आले.भुजबळ यांच्या निवासस्थानी ओबीसी नेत्यांच्या बैठकीत भाजप आमदार राम शिंदे, गोपीचंद पडळकर, समीर भुजबळ, लक्ष्मण हाके, नाना शितोळे, माजी सनदी अधिकारी महेश झगडे बैठकीला उपस्थित आहेत.तसेच ओबीसी समाजातील महत्त्वाचे प्रतिनिधी सुद्धा बैठकीला उपस्थित झाले आहेत. ओबीसी नेत्यांसह सर्व मागासवर्ग समाजाच्या नेत्यांसोबतही चर्चा करण्यात येणार आहेत.मराठा आरक्षण अध्यादेशाच्या मसुद्यावर ओबीसीसह इतर समाजातील बांधवांनी १६ फेब्रुवारीपर्यंत हरकती नोंदवण्यावर बैठकीत चर्चा होणार आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यासाठी बॅक डोअर एन्ट्री देण्यात आली आहे. ओबीसींना आरक्षणातून धक्का मारून बाहेर काढण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप भुजबळांनी केला होता.त्यावरही आजच्या बैठकीत चर्चा होणार आहे. घरांची जाळपोळ आणि पोलिसांवरील हल्ले आदी प्रकरणी गुन्हे मागे घेण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी केलेल्या विधानावर देखील चर्चेची शक्यता आहे. तसेच आजच्या बैठकीत काही ठोस कृती कार्यक्रम ठरण्याची शक्यता असल्याने छगन भुजबळ यांच्या निवासस्थानी सुरू झालेल्या बैठकीकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

---

# माजी आमदार दिपक आत्राम यांच्या हस्ते क्रिकेट सामन्यांचे उदघाटन

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील आलापल्ली येथे आदिवासी लोकसेवा फाऊंडेशन कडून आयोजित रात्रकालीन भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन भारत राष्ट्र समितीचे नेते,आदिवासी विद्यार्थी संघाचे विभागीय अध्यक्ष व माजी आमदार दिपक आत्राम यांच्या हस्ते करण्यात आले.



या उदघाटन सोहळ्याला सह उदघाटक म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्या अनिता दिपक आत्राम तर अध्यक्ष म्हणून प्रतिष्ठित व्यक्ती ईश्वर वेलादी प्रमुख पाहुणे म्हणून आलापल्ली ग्राम पंचायत चे उपसरपंच विनोद अकनपल्लीवार,माजी सरपंच दिलिप गंजीवार,माजी सरपंच विजय कुसनाके,आदिवासी लोकसेवा फाऊंडेशन चे अध्यक्ष उमेश आत्राम,ग्राम पंचायत सदस्य मनोज बोल्लूवार, ग्राम पंचायत सदस्य संतोष अर्का, ग्राम पंचायत सदस्य मायाताई कोरेत,लक्ष्मण जंगमवार, केसनवार काका,शंकर सिडाम,पत्रकार संघटनेचे सल्लागार माकडे सर,जुलेख शेख,विनोद कावेरी,संदीप बडगे सह आविस व बीआरएस चे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी माजी आमदार दिपक आत्राम यांनी क्रिकेट खेळाविषयी व परिसरातील ज्वलंत समस्यांवर उपस्थित खेडाळु व नागरिकांना मोलाचे मार्गदर्शन केले.रात्रकालीन भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्यासाठी प्रथम पुरस्कार माजी आमदार दिपकदादा आत्राम तर द्वितीय पुरस्कार माजी जिल्हा परिषद सदस्या अनिता दिपक आत्राम यांच्याकडून असे एकूण दोन पुरस्कार ठेवण्यात आले.आदिवासी लोकसेवा फाऊंडेशन कडून आयोजित रात्रकालीन भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे उदघाटनीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रतीक गेडाम यांनी मानले.या सामन्यांच्या यशस्वीतेसाठी क्रीडा अध्यक्ष रुपेश आत्राम,प्रतीक गेडाम, तिरुपती वेलादी,आशुतोष येनगंदलवार,लक्ष्मण येनगंदलवार,सूरज मडावी,रोहन येदासलवार,राहुल सिडाम,नोमेश आलाम, रोहित सडमेक,समीर बावणे सह आदिवासी लोकसेवा फाऊंडेशन च्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---

# निळकंठराव शिंदे प्रशासकीय सेवा महाविद्यालयात गणराज्यदिन

**वरोरा । प्रतिनिधी**

स्थानिक के. निळकंठराव शिंदे प्रशासकीय सेवा महाविद्यालयान ७५ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रा धनराज आस्वले, जेष्ठ समाजसेवी व अध्यक्ष श्रीनिवास शिंदे मेमोरियल रवींद्र शिंदे चॅरीटेबल ट्रस्ट, प्रमुख पाहुणे म्हणून लाभले.



महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स. ८.३० वाजता ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थीनी देशभक्तीपर गिते व नृत्य, सादर केले. प्रा. पियुष लांडगे यांनी गीत सादर केले तर दिव्या पेचे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. आस्वले यांनी ३९ देशात भ्रमण केले व त्यांच्या अभ्यासानुसार जगात भारतीयांचे स्थान उच्च आहे असे त्यांच्या भाषणातून निर्दशनास आले.त्यांनी आपल्या मृदू वाणीतून विद्यार्थाना प्रजासत्ताकाचा अर्थ समजावून दिला तसेच देशसेवेसाठी आदर्श नागरिक बना असा संदेश दिला. संस्थेचे सचिव डॉ. कार्तिक शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी सर्वोतोपरी कटीबद्ध राहणार असे आश्वासन दिले एवढेच नाही तर विद्यार्थी कुणाल शेंडे व रक्षा काळे यांचा ग्रुप डान्स पोलीस स्टेशन, वरोरा येथील रंगमंचावर सादर करण्यासाठी, विद्यार्थ्यांना उद्युक्त केले. प्राचार्य गुरुदेव जुमडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांतून विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देताना, विद्यार्थीधर्म व शिक्षक धर्म यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्तसंचालन प्रा. प्रणाली नरड यांनी केल तर आभारप्रदर्शन प्रा. सीमा बोभाटे यांनी केले. कार्यक्रमाला प्रा. रेश्मा नरडे, प्रा. प्रमोद पाठक, डॉ. प्रशांत पाठक, प्रा.रुपेश टाळे, इंदिरा निखाडे तसेच समस्त प्राध्यापक, विद्यार्थी, साईनागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक, प्रा-मंडल इत्यादींची उपस्थिती लाभली, कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रोशन डोंगरे, मानसी गमे, प्रणाली मोडक, प्रणाली मेश्राम, आत्राम, चवले यांनी अथक परिश्रम घेतले.

---

# विद्यार्थींच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी स्नेह संमेलन हे उत्तम व्यासपीठ–केंद्र प्रमुख कुसराम

## ओडीगुडम शाळेत विविध क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**अहेरी । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये उपजतच काही गुण असतात.ते शाळेत दाखल झाल्यानंतर त्यांचे अंगी असलेल्या कला गुणांना वाव देण्यासाठी शाळांतून विविध कार्यक्रम व उपक्रम राबविले जातात . त्याचाच एक भाग म्हणजे वार्षिक स्नेहसंमेलन महोत्सव यातुन विद्यार्थीना एक व्यासपीठ निर्माण होऊन त्यांचे अंगी असलेल्या क्रिडा व सांस्कृतिक कला कौशल्यांना प्रेक्षकांसमोर सादर करण्याची संधी उपलब्ध होते.यातुन विद्यार्थ्यांमध्ये धाडस निर्माण होईल.खेळातुन शिल, बुध्दी,सेवा,शिस्त,त्याग व बल याचे संवर्धन होईल. नृत्य व नाटकातून ते सामाजिक प्रबोधन करतील म्हणून शाळा लहान असो व मोठी असो त्यानी वर्षातून एकदा वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करावे असे आवाहन केंद्र प्रमुख लक्ष्मी कुसराम यांनी केले.त्या जि.प.शाळा ओडीगुडम येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.



यावेळी मंचावर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जयंत टेकुलवार,माजी सरपंच मधुकर वेलादी,पोलिस पाटील लच्चमा पानेमवार,उपाध्यक्ष मल्लेश टेकुलवार,मुरलीधर कोडशेपवार, मुख्याध्यापक संतोष बद्दीवार, सुमित्रा वासेकर,हनमंत संदरापवार,शंकर टेकुलवार, ज्योती तलांडे यांची होती.शाळेतील इयत्ता पहिली पासूनच्या सर्वच विद्यार्थीनी या कार्यक्रमात सहभाग दर्शवून आपले कला कौशल्य गावक-यांसमोर सादर केलेत.यादरम्यान विद्यार्थ्यांच्या क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या.सांस्कृतिक कार्यक्रम व क्रिडा स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संतोष बद्दीवार यांनी केले. विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्याबरोबर विविध कार्यक्रम व उपक्रम आयोजित करित असल्या बाबतची माहिती दिली.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन शिक्षक डॉ.आसाराम तोंडे यांनी केले.कार्यक्रम यशस्वितेसाठी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांचे सहकार्य मिळाले.

---

# विदर्भ किसान मजदूर कॉँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी ॲड.अविनाश ठावरी

**वरोरा । प्रतिनिधी**

विदर्भ किसान मजदूर कॉँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष गजानन गावंडे यांचे आकस्मात निधन झाले. त्यामुळे विदर्भ किसान मजदूर कॉँग्रेसचे अध्यक्ष माजी खासदार नरेश पुगलिया यांच्या आदेशानुसार चंद्रपूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी ड. अविनाश ठावरी यांची निवड करण्यात आली असून जुनी जिल्हा कार्यकारिणी कायम राहणार आहे. या निवडीबद्दल ड. ठावरी यांनी कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि त्यांचे मार्गदर्शक नरेश पुगलिया यांचे आभार मानले. शेतकरी, शेतमजूर, कामगार व जनतेच्या न्याय हक्कांसाठी व हितासाठी सदैव कार्यरत असलेली विदर्भ किसान मजदूर कॉँग्रेस या संघटनेत सर्वांना सोबत घेऊन यशस्वीरीत्या ही जबाबदारी पार पाडू असे सांगितले. ड. ठावरी हे विद्यार्थी दशेपासूनच विद्यार्थी चळवळीमध्ये सहभागी असून ते विद्यार्थी जीवनात आंबेडकर विधी महाविद्यालय नागपूरचे माजी सचिव तसेच डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ अंतर्गत आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा चे सचिव पद भुषविले आहे. तसेच पुढे राजकारणात सक्रिय झाल्यानंतर चंद्रपूर जिल्हा युवक कॉँग्रेसचे माजी अध्यक्ष,चंद्रपूर जिल्हा कॉँग्रेसचे माजी महामंत्री, महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेसचे माजी प्रदेश प्रतिनिधी अशा महत्वपूर्ण जबाबदाऱ्या स्विकारल्या आहे. माजी खासदार नरेशबाबू पुगलिया यांचे एकनिष्ठ कार्यकर्ते



म्हणून त्यांची जिल्ह्यात ओळख आहे. या निवडीबद्दल युवानेते राहुल पुगलिया, करण पुगलिया, शहराध्यक्ष देवेंद्र वेले, जिल्हा महासचिव अशोक नागापूरे, चंद्रशेखर पोडे, कामगार नेते शिवचंद काळे, साईनाथ बुचे, वसंत मांढरे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# प्रभू श्रीराम व्रतस्थ,आदर्श व मानवतावादी जीवनाचे प्रतीक–मंत्री चंद्रकांत पाटील

## संस्कृती प्रतिष्ठान,शि.प्र.मंडळीतर्फे 'अपने अपने राम' कार्यक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

प्रभू श्रीराम केवळ देव नाहीत, तर व्रतस्थ व आदर्श जीवनाचे प्रतीक आहे. अखंड भारतातील हिंदूंचे परम श्रद्धापीठ आहे. राम मंदिर केवळ वास्तू नसून, श्रद्धास्थान आहे. प्रभू रामाच्या आदर्शावर तंतोतंत काम करणार्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अकरा दिवस व्रत केले असून, खऱ्या अर्थाने रामराज्य येण्यासाठी प्रयत्न करत आहेत, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.




संस्कृती प्रतिष्ठान आणि शिक्षण प्रसारक मंडळीतर्फे (शि. प्र.) आयोजित डॉ. कुमार विश्वास यांच्या अमोघ वाणीतील 'अपने अपने राम' या तीन दिवसीय विशेष कार्यक्रमात चंद्रकांत पाटील बोलत होते. टिळक रस्त्यावरील एसपी कॉलेजच्या मैदानावर उभारलेल्या भव्य रामनगरीमध्ये अयोध्येतील राममंदिराच्या प्रतिकृतीच्या साक्षीने होत असलेल्या या कार्यक्रमावेळी आमदार भीमराव तापकीर, पुण्याचे पोलीस आयुक्त रितेश कुमार, पोलीस उपायुक्त संदीप सिंह गिल, अभिनेता क्षितिज दाते, रमेश परदेशी संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी, विनोद सातव, सुभाष नाणेकर, हेमंत रासने, संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक माजी महापौर, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ आदी उपस्थित होते.चंद्रकांत पाटील म्हणाले, वर्षानुवर्ष पत्र्याच्या शेडमध्ये राहिलेले प्रभू श्रीराम अयोध्येत भव्यदिव्य व सुंदर मंदिरात विराजमान होत आहेत. हा आनंदोत्सव आपल्या सर्वांनाच भक्तिरसात न्हाऊ घालत आहे. देशातील वातावरण राममय झाले आहे. रामराज्य येऊ घातले आहे. आपण सर्वांनी एकमेकांना भेटल्यावर राम राम घालायला हवा. डॉ. कुमार विश्वास यांच्या अमोघ वाणीत रामकथा ऐकण्याची संधी मुरलीधर मोहोळ यांनी पुणेकरांना दिली, याबद्दल त्यांचे कौतुक करतो.मुरलीधर मोहोळ म्हणाले, गेल्या तीन दिवसांपासून डॉ. कुमार विश्वास यांनी आपल्या रसाळ वाणीने रामकथेच्या भक्तीरसाची अनुभूती दिली आहे. विश्वास यांनी आपल्याला राम सोप्या, कलात्मक व काव्यात्मक पद्धतीने सांगितला. या ऐतिहासिक आनंदोत्सवाच्या यशस्वीतेसाठी योगदान देणाऱ्या प्रत्येकाचे आभार मानतो.कविता तिवारी, मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी लकी ड्रॉ काढण्यात आला. तीनशे विजेत्यांना संस्कृती प्रतिष्ठानतर्फे अयोध्येला नेण्यात येणार असल्याचे मोहोळ यांनी सांगितले.

### रामकथा परमानंद देणारी साहित्यकृती : डॉ.कुमार विश्वास

साध्य व साधन सुचिता रामकथेतून शिकायला मिळते. वाईटावर नेहमी चांगल्याचा व सत्याचा विजय होतो, हा रामचरित्राचा सार आहे. त्यामुळे चांगल्या कामांसाठी चांगल्या साधनांचा उपयोग करायला हवा. अन्याय सहन करण्याची मर्यादा किती ठेवायची आणि योग्यवेळी कठीण प्रसंगावर चांगल्या मार्गाने मात कशी करायची, याचा वस्तुपाठ रामकथा आहे. प्रत्येक युगात रावणरूपी एखादी वाईट शक्ती आपल्यावर आक्रमण करत असते. त्यावेळी कोणीतरी, कुठेतरी कौशल्येच्या पोटी राम जन्म घेतो आणि त्या वाईटाचा संहार करतो. रामकथा आपल्याला शिकवते, भावुक करते, वेळप्रसंगी रडवते, राग येण्यास प्रवृत्त करते, पण शेवटी रावणाला म्हणजे वाईट शक्तीला पराभूत करते. ही रामकथा ऐकताना आपल्याला परमानंदाची अनुभूती आल्याशिवाय राहत नाही, असे डॉ. कुमार विश्वास यांनी सांगितले.

# पायाभूत सुविधांच्या विकासाद्वारे जिल्ह्याच्या विकासाचा संकल्प

## उपमुख्यमंत्री अजित पवार



**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेती, उद्योग, व्यापार, रोजगार, स्वयंरोजगार, पर्यटन, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासोबतच पायाभूत सुविधांच्या निर्मितीद्वारे जिल्ह्याचा सर्वांगीण विकासाचा संकल्प असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त पोलीस कवायत मैदान येथे आयोजित समारंभात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, पुणे जिल्हा हा वेगाने नागरीकरण होत असलेला जिल्हा आहे. जिल्ह्यातील रस्ते, मेट्रो मार्ग, रेल्वे मार्गाद्वारे विकासाला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. खोपोली ते खंडाळा मिसिंग लिंकचे काम अंतिम टप्प्यात आहे. शहरातील वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यासाठी विविध विकासकामे सुरू करण्यात आली आहेत. नागरिकांनी या कामांसाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.पुणे शहर शैक्षणिक आणि सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जात असल्याचे नमूद करून श्री.पवार म्हणाले, जिल्ह्यातील गडकिल्ले, ऐतिहासिक स्थळ, अष्टविनायक, तीर्थक्षेत्र, राष्ट्रपुरुषांची स्मारके आदींच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला आहे. भिडेवाडा येथे ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती प्रदर्शित करणारे प्रेरणादायी स्मारक उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.जिल्ह्याच्या विकासासाठी विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे सांगून श्री.पवार म्हणाले, प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक लाभ देण्यात येत आहे. राज्य शासनाने 'नमो शेतकरी महासन्मान योजना' सुरू केल्याने शेतकरी कुटुंबांना १२ हजार रुपये वार्षिक लाभ होणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वहिनी योजनेवर भर देण्यात येत आहे. जिल्ह्यातील वीज उपकेंद्र आणि वीज वाहिन्यांच्या विकासावर भर देण्यात येत आहे. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचा ९४८ कोटी रुपयांचा वार्षिक आराखडा राज्य समितीकडे सादर करण्यात आला असून ४०० कोटींची अतिरिक्त मागणीही करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

# मंगळवेढ्यात पाण्यावरून लोकसभेवर पुन्हा बहिष्काराचा ठराव

**मंगळवेढा :** दक्षिण भागातील शेतीच्या पाण्यावरून गेली अनेक वर्षे राजकीय व्यासपीठावरून सर्वच राजकीय पक्षांनी फसवणूक केल्यामुळे पाणी प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत लोकसभा व विधानसभा निवडणुकीला मतदान नाही असा ठराव प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या ग्रामसभेत तालुक्यातील निंबोणी ग्रामपंचायतीत मांडण्यात आला.या ग्रामपंचायतीची ग्रामसभा सरपंच बिरूदेव घोगरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यामध्ये या ठरावास मंजुरी देण्यात आली. त्या ग्रामसभेत १२४ ग्रामस्थ उपस्थित होते. दक्षिण भागातील जवळपास ३५ गावांना शेतीच्या पाण्यावरून वंचित ठेवल्याच्या निशेधार्थ सन २००९ च्या लोकसभा निवडणुकीत ३५ गावाने बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला. त्यामध्ये १० गावात कडकडीत बहिष्कार झाला



तर १२ गावात अल्पसे मतदान झाले. त्यानंतर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सत्तेवर आले.३५ मधील अकरा गावांना म्हैसाळ योजनेत समाविष्ट करण्यात आले उर्वरित २४ गावासाठी मंगळवेढा उपशासन योजनेचा प्रस्ताव सादर केल्यानंतर या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली व भाजप शिवसेना सरकारच्या काळात या योजनेचे पुर्नसर्वेक्षण करण्यात आले.या काळातील तत्कालीन जलसंपदा मंत्री विजय शिवतारे यांनी या योजनेत गंडवा गंडवी योजना असे संबोधन हिणवण्यात आले.२०१९ चया तीन पक्षाच्या महाविकास आघाडी सरकारमध्ये पुन्हा गावे आणि पूर्ववत ठेवत परत सर्वेक्षण करण्यात आले तर २०२१ च्या पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक आमदार भाजपचा करा या योजनेला मंजुरी सह केंद्रातून पैसे उपलब्ध करतो असे आश्वासन दिले होते त्यानंतर विधिमंडळाच्या अधिवेशनात देखीलआ. समाधान आवताडे यांनी प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी सात दिवसात मुख्यमंत्र्याचे सही व सात दिवसात कॅबिनेटचे मंजुरी असे उत्तर दिले होते नुकतीच मुख्यमंत्र्याची सही झाल्याचे सांगण्यात आले त्यामुळे या योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळ समोर कधी जाणार आणि लोकसभा निवडणुकीपूर्वी मंजुरी मिळणार का यावरून या भागातील जनतेमधून संभ्रम निर्माण झाल्यामुळे अखेर या ग्रामपंचायतीत ग्रामपंचायत सदस्य विनायक माळी यांनी हा ठराव मांडला.

# रुक्मिणी महोत्सवात अडीच दिवसांतच ५ लाखांची विक्री! पुणे, छत्रपती संभाजीनगर विभागातील बचतगटांनी मानले झेडपी सीईओंसह सोलापूरकरांचे आभार

**सोलापूर :** पुणे व छत्रपती संभाजी नगर विभागातील महिला बचत गटांच्या विविध वस्तूंना सोलापूरकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. मिनी सरस व रुक्मिणी महोत्सवातून अवघ्या दोन ते अडीच दिवसात पाच लाख रुपयांची उलाढाल झाली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्या उपस्थितीत समारोपाचा कार्यक्रम पार पडला. सोलापूरकरांचा प्रतिसाद पाहून बचतगटांनी पुन्हा एकदा महोत्सव आयोजित करण्याची विनंती केली.महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत रंगभवनजवळील वोरोनोको प्रशालेच्या मैदानात १९ जानेवारीला दुपारी एकच्या सुमारास पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते मिनी सरस व रुक्मिणी महोत्सवाचे उद्घाटन झाले होते. पहिल्याच दिवशी दुपारनंतर रात्री दहापर्यंत एक लाख १६ हजार ४२२ रुपयांची उलाढाल झाली होती.२० जानेवारीला संपूर्ण दिवसभरात दोन लाख रुपयांची आणि महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच २१ जानेवारीला दुपारी एक वाजेपर्यंत दीड लाखांपर्यंत उलाढाल झाली. या महोत्सवात पुणे व छत्रपती संभाजी नगर विभागातून एकूण ६० स्टॉल लावण्यात आले होते. त्यात मिलेट कुकीज, चटणी, लोकरीच्या वस्तू, लाकडी व चामडीच्या वस्तू, साड्या, चादरी, कृत्रिम दागिने, लेडीज बॅग, ड्रेस मटेरियल यासह चवदार खाद्यपदार्थ देखील विक्रीसाठी ठेवण्यात आले होते.सीईओ मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे समन्वयक सचिन चवरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी या महोत्सवासाठी परिश्रम घेतले. नेटक्या नियोजनामुळे व सोलापूरमध्ये संधी दिल्याने सर्वच महिलांनी सीईओ आव्हाळे यांचे आभार मानले. पहिल्या दिवशी सीईओंनी स्वत: काही वस्तूंची खरेदी केली होती. त्यानंतर जिल्हा परिषदेतील इतर अधिकाऱ्यांनीही त्याठिकाणी खरेदी केली.रुक्मिणी महोत्सवाच्या शुभारंभप्रसंगी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंसाठी कोल्ड स्टोअरेज उभारले जाईल. त्यासाठी एक कोटी सहा लाखांचा निधी जिल्हा नियोजनमधून मंजूर केल्याचे सांगितले होते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे मेळघाट मार्केटप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या वस्तू खरेदी करून त्यांना चांगले पैसे मिळतील, अशी व्यवस्था निर्माण करता येईल, असे स्पष्ट केले होते. त्याकडे जिल्ह्यातील सर्व महिला बचत गटांचे लक्ष लागले आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऊरळी कांचन पोलीस स्टेशनचे उद्घाटन

# कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून पोलीस विभागाने सर्वोत्तम कामगिरी करावी – उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

पोलीस विभाग अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध असून पोलीस विभागाने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवतांना नेहमी सर्वोत्तम कामगिरी करून आपली प्रतिमा उंचावावी, असे प्रतिपादन उपमख्यमंत्री अजित पवार यांनी केले. ऊरळी कांचन येथील पोलीस स्टेशनच्या उद्घाटन प्रसंगी श्री. पवार बोलत होते. यावेळी आमदार अशोक पवार, राहुल कुल, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हा पोलीस अधीक्षक अंकित गोयल, पोलीस उपायुक्त आर. राजा, अपर पोलीस अधीक्षक आनंद भोईटे, उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्नील जाधव, पोलिस निरीक्षक शंकर पाटील, सरपंच भाऊसाहेब कांचन आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, पोलीस स्टेशनसाठी १०० पदांची मंजुरी देण्यात आली आहे. गुन्हेगारी रोखण्यात पोलिसांनी कठोरपणे कारवाई करावी. पोलीस विभागाला पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना निधीतून निधी देण्यात येत आहे. या निधीतून पोलिसांसाठी वाहने, अत्याधुनिक यंत्रणा, गृहप्रकल्प इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध होत आहेत. पोलिसांनी त्यांच्या तंदुरुस्तीसाठी लक्ष द्यावे. सायबर गुन्हे रोखण्यासाठी अधिकारी–कर्मचारी यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे





प्रशिक्षण द्यावे. कोणत्याही परिस्थितीत गुन्हेगारांचे उदात्तीकरण होता कामा नये. गुन्हेगारीवर पोलिसांचा वचक राहिला पाहिजे. पोलिसांच्या मनोबलावर परिणाम होणारे कृत्य होणार नाही याची दक्षता घ्यावी. पोलिसांनी कोणाच्याही दबावाखाली काम न करता गुन्हेगारी मोडून काढावी. सध्या पोलिसांच्या संकल्पनेत बदल झाला आहे. स्मार्ट पोलिसिंग च्या माध्यमातून पोलीस आणि नागरिक यांच्यात चांगले नाते निर्माण होत आहे असे श्री. पवार म्हणाले.पोलिसांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, गुन्हेगारी तपासाचा वेग वाढवावा, अभिलेख वर्गीकरण अद्ययावत ठेवावे. वाहतुकीचे योग्य नियमन करावे, कर्मचाऱ्यांना अद्ययावत प्रशिक्षण द्यावे. सर्वच बाजूंनी पोलीस दलाची क्षमता वाढवा. नवीन पोलीस स्टेशनचा प्रश्न मार्गी लावला जाईल. पोलीस विभागाला सर्व सुविधांचा पुरवठा करण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.ऊरळी कांचन गावाची लोकसंख्या लाखाच्या पुढे गेली आहे. स्थानिक नागरिकांची येथे नगरपरिषद व्हावी अशी मागणी होत असून यावर निश्चितच मार्ग काढला जाईल. पुणे–सोलापूर महामार्ग गावातून जात असल्याने वाहतूककोंडी होत असते. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी योग्य निर्णय घेतला जाईल. गावाच्या विकासाच्यादृष्टीने अनेक कामे पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न केले जातील. आमदार श्री. पवार म्हणाले, गेल्या तीन वर्षांपासून याठिकाणी पोलीस स्टेशन व्हावे यासाठी प्रयत्न करण्यात येत होते. उरुळी कांचन गावाची लोकसंख्या एक लाखाच्या पुढे गेली आहे. लोणी काळभोर परिसरात अपर तहसील कार्यालय मंजूर झाले आहे. उरुळी कांचन नगरपरिषद व्हावी अशी नागरिकांची मागणी आहे. ग्रामीण रुग्णालयाला मंजुरी मिळाली आहे. परंतु जागेअभावी तो प्रश्न प्रलंबित आहे. या ठिकाणी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकात श्री. गोयल म्हणाले, या ठिकाणी लोणी काळभोर स्टेशनची खूप जुनी पोलीस चौकी होती. पोलीस स्टेशन मंजुरी मिळून दोन वर्ष झाली. मनुष्यबळाला अभावी पोलीस स्टेशन सुरू करण्यात आले नव्हते. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पोलीस विभाग बळकटीकरणासाठी बरीच मदत मिळाली. त्याच्या माध्यमातून पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या आहेत. या पोलीस स्टेशन अंतर्गत १० गावांचा समावेश आहे. या ठिकाणची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच गुन्हे नियंत्रण करण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# माजी जि.प.अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्या हस्ते व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन

## ब्ल्यू स्टार युवा मंडळ वेलगूर तर्फे भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील वेलगुर येथील ब्ल्यू स्टार युवा मंडळ वेलगूर तर्फे भव्य खुली व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित केली असून या व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन आविसं काँग्रेसचे युवा नेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांच्या हस्ते करण्यात आले.या व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांच्या कडून प्रथम पारितोषिक देण्यात येत आहे.तर द्वितीय पारितोषिक लॉयड्स मेटल अँड एनर्जी प्रा.लि. सुरजागड तर्फे देण्यात येत आहे.तृतीय पारितोषिक वनपरिक्षेत्र अधिकारी अहेरी – व वेलगुर ग्रामपंचायतचे सदस्य रोहित अशोक गलबले कडून देण्यात येत आहे.

या भव्य व्हॉलीबॉल स्पर्धा कार्यक्रमाचे सहउदघाटक म्हणून आदिवासी काँग्रेस सेलचे जिल्हा अध्यक्ष तथा सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक हनमंतू मडावी होते.अध्यक्ष म्हणून लॉयड्स मेटल अँड एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडचे बाबूजी सैनांनी होते.प्रमुख पाहुणे म्हणून अहेरी पंचायत समितीचे माजी उपसभापती गीता चालूरकर होते.यावेळी अशोक येलमुले माजी उपसरपंच,अहेरी नगरपंचायतचे नगरसेवक प्रशांत गोडसेलवार, रोहित गलबले सदस्य ग्रा.प. वेलगुर,लालूजी करपेत माजी सरपंच वेलगुर,वामन मडावी सदस्य ग्रा.प.वेलगुर,कुसुम दुधी माजी सरपंच ग्रा.प.वेलगुर,मनीष दुर्गे ग्रा.प.सदस्य वेलगुर,मनोहर चालूरकर पो.पा. वेलगुर,विनोद दुर्गे,रज्जक खान,अरविंद कनाके,तिरुपती दुल्लम, आलापल्ली चे पत्रकार शंकर डोलगे, रफीक पठाण,संतोष गुरनुले,डॉ.गलबलेजी वेलगुर, वासुदेव मडावी,मुक्तेश्वर गदेकर,अशोक चालूरकर, रगुणात राऊत,मारोती गाऊतरे,डॉ.सपन हलदार, आनंदराव मराठे, शंकर झाडे, दिवाकर कस्तुरे,बापूजी गुरनुले, ज्येष्ठ नागरीक शंकर चालूरकर, प्रफुल ओंडरे,प्रदीप झाडे,प्रशिक दुर्गे,सचिन पंचार्य,प्रमोद गोडसेलवारसह आदी उपस्थित होते.



# प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत विद्यार्थ्यांना वाटले पाचशे शैक्षणिक किट

## जे.सी.आय मुल चा अभिनव उपक्रम

**मूल । प्रतिनिधी**

मानव सेवा हीच ईश्र्वर सेवा मानून काम करणाऱ्या जे सी आय संस्थेने गणराज्यदिनाचे औचित्य साधत टेकाडी,आकापूर,मरेगाव या जिल्हा परिषद शाळातील ५०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट चे वाटप केले.

जे सी आय ही राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणारी मोठी सामाजिक संस्था आहे.वर्षभर वेगवेगळे उपक्रम राबवून आपली सामाजिक बाधिलकी जे सी आय संस्थेचे पदाधिकारी कायम राखत असतात.त्याच उपक्रमाचा भाग म्हणुन जे सी आय मूल ने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत टेकाडी मरेगाव आणी आकापूर या गावातील जिल्हापरिषद च्या विद्यार्थ्यांना पाचशे शैक्षणिक किट वाटप करून विद्यार्थ्यांना मदत केली.यावेळी त्या त्या गावातील प्रतिष्ठित नागरिक आणी शाळेचे शिक्षक उपस्थित होते.त्याच्या हया उपक्रमाचे गावातील नागरिकांनी कौतुक केले आहे.


किट वाटप चा उपक्रम पार पाडण्यासाठी जे सि आय मुल चे अध्यक्ष ऋतिक गोयल.सचिव जेसी यश चिमडलवार,उपाध्यक्ष जेसी आशिष उधवाणी,तसेच २०२३ चे जेसी अध्यक्ष आशिष गोयल,जेसी सीए अनिकेत अग्रवाल,जेसी सनी खियानी,जेसी कृष्णा सूचक,अमन गोयल, जेसी आल्हाद मोगरे,जेसी धवल जैन,जेसी निर्मल पडगेलवार,जेसी आदित्य बुक्कावार,जेसी हर्षल मार्टिवार ,जेसी शुभम अग्रवाल या सर्वांनी यशस्वी नियोजन करीत मेहनत घेतली.




# बल्लारपूर पब्लिक स्कूल,मूल येथे गणराज्य दिन साजरा

**मूल । प्रतिनिधी**

येथील शिक्षण प्रसारक मंडळ मूल द्वारा संचलित बल्लारपूर पब्लिक स्कूल मूल येथे गणराज्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव ड.अनिल वैरागडे यांच्या हस्ते ध्वजरोहन करण्यात आले. तसेच मुख्य अतिथी म्हणून पंकज अहीर न्यायाधीश न्यायदंडाधिकारी,दिवाणी व फौजदारी न्यायालय मुल ,विशेष अतिथी म्हणून डॉ.आगलावे प्राध्यापक कर्मवीर महाविद्यालय, मुल व शाळेचे प्राचार्य विनोद बल्लारपूर पब्लिक स्कूल,मूल तसेच अतिथी म्हणून गीतेश गांवतुरे विद्यार्थी प्रतिनिधी बल्लारपूर पब्लिक स्कूल मूल आणि उत्कर्षा वाळके विद्यार्थिनी प्रतिनिधी बल्लारपूर पब्लिक स्कूल मूल कार्यक्रमात उपस्थित होते.प्राचार्य यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली तसेच सर्व मान्यवारांनी आपले मनोगत व्यक्त केले विद्यार्थांनी दिनाचे औचित्य साधून वेगवेगळे नृत्य व क्रीडा नृत्य व तिरंगा ध्वज ला मानवंदना देण्यासाठी परेड चे प्रदर्शन करण्यात आले.आणि विद्यार्थांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले विद्यार्थ्यांचा उत्साह दिगुणित करण्याकरिता विद्यार्थना पारितोषिक,मेडल,व प्रमाणपत्र देण्यात आले आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तोषी जयस्वाल सांस्कृतिक प्रभारी बल्लारपूर पब्लिक स्कूल मूल तसेच अंश तेलसे वर्ग ९ वा व कशिश रामटेके इयत्ता नववी यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता प्राचार्य,शिक्षक, शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थांनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दुर्गा कोटगले यानी केले व कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या राष्ट्रगीताने झाली.





# महाराष्ट्र एनसीसी संचालनालय देशात प्रथम 'प्रधानमंत्री बॅनर' विजेत्याचा बहुमान

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

२७: महाराष्ट्र नॅशनल कॅडेट कॉर्प्स (एनसीसी) संचालनालयाने प्रतिष्ठेच्या 'प्रधानमंत्री बॅनर'चे विजेते पद सलग तिसऱ्यांदा पटकावून देशातील सर्वोत्तम संचालनालयाचा बहुमान पटकविला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज महाराष्ट्राला हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.येथील कॅन्टॉनमेंट भागातील करीअप्पा मैदानावर आयोजित एनसीसी रॅली मध्ये प्रधानमंत्र्यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री बॅनर' २०२३-२४ च्या विजेत्या व उपविजेत्यासह एनसीसीच्या बेस्ट कॅडेट्सला सन्मानित करण्यात आले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, एनसीसीचे महासंचालक लेफ्टनंट जनरल गुरबीरपाल सिंह यांच्यासह गणमान्य व्यक्ती यावेळी उपस्थित होते.

यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते महाराष्ट्र एनसीसी संचालनालयास (१२२ कॅडेट चा सहभाग), मेजर जनरल योगेंद्र सिंग यांनी बॅनर स्वीकारला . प्राप्त विजेतेपदाचा चषक महाराष्ट्र एनसीसीची कॅडेट काजल सातपुते,नचिकेत मेश्राम, खुशी झा, विवेक गांगुर्डे यांच्यासह संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंद्र सिंग (वीएसएम) यांनी प्रधानमंत्री बॅनर स्विकारले. देशातील एकूण १७ एनसीसी महासंचालनालयाच्या डिसेंबर २०२२ ते नोव्हेंबर २०२३ मधील विविध स्तरावरील मुल्यांकन तसेच यावर्षी १ ते २७ जानेवारी दरम्यान दिल्लीत आयोजित प्रजासत्ताक दिन शिबिरातील विविध स्पर्धांतील सर्वोत्तम कामगिरीच्या आधारावर आज 'प्रधानमंत्री बॅनर' चा बहुमान विजेत्या व उपविजेत्या संचालनालयास प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात महाराष्ट्राला विजेत्याचा तर कर्नाटक आणि गोवा एनसीसी संचालनालयास उपविजेतपदाचा बहुमान विभागून प्रदान करण्यात आला. यावेळी, नागपूरच्या रिमाउंट व वेटेरिनरी स्काड्रन कॅडेट ने सर्वोत्कृष्ट टेंट पेगर ट्रॉफी जिंकली. महाराष्ट्र संचालनालय यांनी सलग तिसऱ्यांदा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार पटकावला आहे.महाराष्ट्राला सात वर्षानंतर सलग तीसऱ्यांदा प्रधानमंत्री बॅनरमहाराष्ट्र एनसीसी संचालनालयाला यापूर्वी एकूण १९ वेळा प्रधानमंत्री बॅनरचा बहुमान मिळाला आहे. राज्याने मुसंडी घेत मागील दोन वर्षांपासून प्रधानमंत्री बॅनरचा मान पटकाविला होता. यावर्षीही महाराष्ट्राने हा बहुमान मिळविल्याने राज्याला तब्बल आठ वर्षाने सलग तीन वर्ष प्रधानमंत्रीबॅनर पटकावून उत्तम कामगिरी केली आहे. महिनाभर चाललेल्या शिबिरात छात्रसैनिकांनी कवायती, राजपथ संचलन, पंतप्रधानांना मानवंदना, पंतप्रधानांच्या रॅलीचे नियोजन, फ्लॅग एरिया ब्रीफिंग आणि सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध स्पर्धांमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली. संपूर्ण शिबिरात सर्व स्पर्धांमध्ये तुकडीच्या सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीमुळे एनसीसी महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट संचालनालयाचा मान मिळाला. २७ जानेवारी रोजी करिअप्पा संचलन मैदानावर आयोजित पंतप्रधानांच्या रॅलीमध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी हस्ते एनसीसीच्या महाराष्ट्र संचालनालयाला पंतप्रधान ध्वज निळाला.



# आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन

## २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजन



**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती द्वारा संचालित आनंद निकेतन महाविद्यालय आनंदवन वरोरा येथे राज्यशास्त्र विभाग आणि समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुटे व समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. रंजना लाड यांनी यांनी स्पर्धेचे आयोजन केले. त्या ठिकाणी स्पर्धेला भेट देण्यासाठी उपविभागीय अधिकारी शिवनंदा लंगळापुरे व नायब तहसीलदार काळे यांची उपस्थिती होती. स्पर्धेला एकूण चौप्पन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्या स्पर्धेत प्रथम दीपाली प्रजापती द्वितीय ऐश्वऱ्या आत्राम व समीक्षा गजभे, तृतीय प्राजक्ता मिलमीले व धनश्री होरे प्रोत्साहनपर हर्षदा ठोंबरे,समृद्धी बुरानकर,निकिता कापसे,वैष्णवी घुमे,प्रिया दाताळकर,कांचन बल्की स्पर्धेत विजेते ठरले.परीक्षक प्रा. प्रियंका बुकीया प्रा. कल्याणी आत्राम होते यावेळी मतदान दूत शुभम आमने यांचे देखील सहकार्य लाभले.

# सरकारकडून हट्ट पुरवण्याचे काम सुरू– छगन भुजबळ

**नाशिक–**सरकारकडून हट्ट पुरवण्याचे काम सुरु आहे. पण, ओबीसींमध्ये आरक्षण संपल्याची भावना आहे. त्यात तथ्य आहे. ओबीसी समाजही मतदान करतो हे सरकार विसरले आहे असा टोला शिंदे सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनी लगावला आहे.दरम्यान छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, भविष्यात दलित, आदिवासींमध्येसुद्धा कोणीही घुसतील असे करता येते का? मला दलित– आदिवासी समाजाच्या नेत्यांना विचारायचे आहे. याचे पुढे काय होणार? सर्टिफिकेट घेऊन आदिवासी होण्याचा प्रकार सोडविताना सरकारच्या नाकी नऊ येत आहे. हा ओबीसींवर अन्याय आहे की, मराठ्यांना फसवले जात आहे? असा सवाल भुजबळ यांनी उपस्थित केला आहे.छगन भुजबळ म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी काल घेतलेल्या निर्णयामुळे ओबीसी समाजात घबराट निर्माण झाली आहे. आमचे आरक्षण संपले आता पुढे काय करायचे असा प्रश्न सर्वांना पडला आहे. शिक्षणासह नोकरभरतीत आपल्याला संधी मिळणार नाही, तिथे मराठे वाटेकरी असणार आहेत. ग्रामपंचायती, पंचायत समित्यांमध्ये आमचे लोक निवडून येत होते, ते सगळे आता जाणार आहे. ओबीसी आरक्षण संपल्यासारखी स्थिती आहे अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे. ही भावना मला चुकीची वाटत नाही.छगन भुजबळ म्हणाले की, मराठा समाजाचा विजय झाला, असे भासविले जात आहे. पण मला तसे वाटत नाही. झुंडशाहीविरोधात असे निर्णय घेता येत नाहीत. ही फक्त सूचना आहे. दि. १६ फेब्रुवारीपर्यंत हरकती मागविण्यात आल्या आहेत. जे वकील असतील, त्यांनी हरकती पाठवाव्यात. लाखोंच्या संख्येने हरकती पाठवाव्यात. सरकारच्या लक्षात येईल, याची दुसरी बाजूदेखील आहे. तसेच सगेसोयरेंसह प्रमुख तीनही मागण्यांना विरोध असल्याचे स्पष्ट केले आहे. याबाबत १६ तारखेपर्यंत हरकती घेऊ.छगन भुजबळ म्हणाले की, आता एकमेकांवर ढकलून चालणार नाही. आपण समता परिषदेच्या माध्यमातून हरकती घेऊ. सगेसोयरे हे कायद्याच्या कसोटीवर टिकणार नाहीत. ओबीसी आरक्षणामध्ये आल्याचा मराठ्यांना आनंद वाटेल. पण १७ टक्क्यांत सर्व येतील. ईडब्ल्यूएसमध्ये, ओपनमध्ये जे आरक्षण मिळत होते, ते यामुळे मिळणार नाही. ५० टक्क्यांत जे खेळत होतात, ती संधी आता गेली. ५० टक्क्यांत मराठा समाज, ब्राह्मण आणि जैन समाज होता, त्यावर पाणी सोडावे लागेल. तसेच ओबीसीला धक्का लागणार नाही असे म्हणतात आणि बॅक डोअर एन्ट्री करतात. जात ही जन्माने येते, फिडेव्हिटने येत नाही.

# मराठा समाजाच्या मागण्या मान्य; मंगळवेढ्यात जल्लोष!



**मंगळवेढा–**सकल मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी आंतरवाली सराटी ते मुंबई या दरम्यान आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेले आंदोलन यशस्वी ठरत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या समाजाच्या सर्व मागण्या मान्य केल्यामुळे मंगळवेढ्यातील दामाजी चौकात फटाके फोडून गुलालाची उधळण करण्यात आली.सकल मराठा समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन देणाऱ्या आतापर्यंतच्या सर्वच पक्षाच्या सत्ताधाऱ्यांनी मात्र सत्तेवर येताच आरक्षणाच्या मागणीकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष केल्यामुळे या समाजाला अखेर रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहिला नाही.मनोज जरांगे पाटील यांनी सकल मराठा समाजाला आरक्षण द्यावे ही मागणी मागणी सुरुवात केल्यापासून अंतरवाली सराटी येथे झालेल्या पोलीस लाठीहल्यानंतर मंगळवेढ्यातील सकल मराठा समाजाच्या भावना अधिक तीव्र झाल्यानंतर रास्ता रोको आंदोलन, मुंडन आंदोलन सरकारच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन, एसटी वरील एसटी बस वरील सरकारी जाहिरातीवरील राजकीय नेत्यांना काळे फसणे या वेगवेगळ्या माध्यमातून मंगळवेढ्यात आंदोलन करत सरकारला आपल्या भावनांची तीव्रता दाखवण्यात मंगळवेढ्यातील सकल मराठा बांधव यशस्वी ठरले होते.आंतरवाली सराटी ते मुंबई दरम्यान आंदोलनामध्ये रांजणगाव ते लोणावळा यादरम्यान संदीप फडतरे,अजित घुले, विनायक हजारे, प्रदीप घुले, लखन माने, प्रकाश मुळीक,संतोष नागणे,त्यांच्यासह भाळवणी येथील आशुतोष वाडेकर सहभागी झाले तर डोंगरगाव येथील मदन पाटील हे डोंगरगाव ते मुंबई दुचाकीवरून आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मार्गस्थ झाले,मरवडे,आंधळगाव,मारापूर,भोसे येथील बांधव सहभागी झाले.आज पहाटेच्या दरम्यान या मागण्या मान्य झाल्यामुळे आज सकाळी दामाजी चौकात फटाके फोडण्यात आले व मराठा बांधवांनी गुलाल उधळला व शहरातून हलग्याच्या आवाजात मिरवणूक काढत आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा जयजयकार करण्यात आला. ग्रामीण भागामध्ये भाळवणी, आंधळगाव, डोंगरगाव, मरवडे, बोराळे, मारापुर, ब्रह्मपुरी,सलगर,खोमनाळ, या ठिकाणी देखील फटाके उडवण्यात आले.

# राज्यस्तरीय मराठी विषय शिक्षकांचे राज्यस्तरीय अधिवेशन संपन्न

## मराठी भाषेला कोणताही विकल्प नसावा - डॉ.विकास आमटे

**वरोरा । आशिष घुमे**

श्रद्धेय बाबा आमटे त्यांच्या कार्य कर्तुत्वाने पुनीत झालेल्या आनंदवन, वरोरा येथे कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन थाटात संपन्न झाले. यात महाराष्ट्रात मराठी भाषा ही बारावीपर्यंत अनिवार्य व्हावी, ती ज्ञानभाषा व्हावी असे मार्गदर्शन मान्यवरांनी केले. हे अधिवेशन तीन सत्रात संपन्न झाले.



मराठी विषय शिक्षक महासंघ चंद्रपूर जिल्ह्याच्या वतीने आयोजित मराठी विषय शिक्षक महासंघ महाराष्ट्राचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन आनंदवन च्या पावनभूमीत आयोजित करण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक, प्राचार्य डॉ श्याम मोहरकर, उद्धाटक डॉ विकास आमटे, स्वागताध्यक्ष आमदार प्रतिभा धानोरकर, विशेष अतिथी प्रा. श्रीकांत पाटील, अध्यक्ष लोकशिक्षण संस्था वरोरा, सुनील डिसले बारामती, अध्यक्ष कनिष्ठ महाविद्यालय मराठी विषय शिक्षक महासंघ महाराष्ट्र , संदीप पाटील आयपीएस नागपूर, उल्हास नरड, शिक्षण उपसंचालक नागपूर, प्राचार्य डॉ मृणाल काळे वरोरा, डॉ. प्रतिभा बिश्वास, उपाध्यक्ष महाराष्ट्र मुंबई आदी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व ग्रंथ पूजन करून करण्यात आली. स्वरानंद आर्केस्ट्रा च्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. या अधिवेशनाचे उद्धाटन डॉक्टर विकास भाऊ आमटे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्धाटन पर मार्गदर्शन करताना मराठी भाषेला गतवैभव प्राप्त करून देण्याचं काम आपण सर्व करत आहात. महाराष्ट्रात मराठी भाषा ही अनिवार्य असावी असा संदेश दिला. संमेलनाचे अध्यक्ष डॉ श्याम मोहरकर सर यांनी मराठी भाषेपुढील आव्हाने, प्राध्यापकांच्या समस्या व प्राध्यापकांची जबाबदारी यावर प्रकाश टाकला. तसेच मराठी भाषेबद्दल निर्माण झालेली अनास्था दूर करण्याचे काम आपण सर्वांनी करावे, मराठी भाषा ही ज्ञान भाषा व्हावी, आपण सर्वांनी विपुल लेखन करावे असे मार्गदर्शन केले. स्वागताध्यक्ष आमदार प्रतिभा धानोरकर यांनी महाराष्ट्रात मराठी भाषा दुर्लक्षित आहे, तिचे संवर्धन, संगोपन झालेच पाहिजे. शिक्षकांच्या समस्या सोडवल्या जाव्यात असे सांगितले. प्रा. श्रीकांत पाटील यांनी मराठी विषयाचे शिक्षकांनी बहुश्रुत राहून विद्यार्थ्यांना मराठी भाषेत आवड निर्माण करण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घ्यावे असे मार्गदर्शन केले. सुनील दिसले राज्याध्यक्ष यांनी मराठी विषय शिक्षक महासंघाचे हे पहिलेच राज्यस्तरीय अधिवेशन हे आंतरराष्ट्रीय किर्तीच्या आनंदवनात होत आहे आणि याचे यशस्वी आयोजन चंद्रपूर जिल्हाने केले .याचा आम्हाला गौरव आहे, असे मत व्यक्त केले. आयपीएस अधिकारी संदीप पाटील यांनी सध्या परिस्थितीत मराठी भाषा जनमनात रुजवण्याचं काम मराठी विषय शिक्षक करत आहात असे सांगितले. हे अधिवेशन कायम स्वरुपी स्मरणात राहावे या करिता मान्यवरांच्या हस्ते माय मराठी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. उद्धाटन सत्रात मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्त मराठी विषय शिक्षकांचा सत्कार करण्यात आला, तसेच मराठी विषयात पीएचडी धारक उच्च गुणवत्ता प्राप्त शिक्षकांचा सन्मानचिन्ह, शाल, पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ ज्ञानेश हटवार जिल्हा प्रतिनिधी चंद्रपूर यांनी केले , तर पाहुण्यांचा परिचय डॉ सुधीर मोते जिल्हाध्यक्ष चंद्रपूर यांनी केले. पहिल्या उद्धाटन सत्राचे सूत्रसंचालन प्रा. पद्मा पालांदूरकर शंकरपूर यांनी केले तर आभार प्रा. गजानन सातपुते खडसंगी यांनी केले.दुसऱ्या सत्रात पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमाच्या घटकावर विविध तज्ञ मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन करण्यात आले . या सत्राचे अध्यक्ष प्रा. भगवंत शोभणे, भंडारा हे होते. अध्यक्षीय मनोगतातून भाषा विषय शिकवितांना नाविन्यपूर्ण उपक्रमांचा वापर करावा असे सांगितले. मार्गदर्शक म्हणून डॉ माधुरी काळे वर्धा, सदस्य अभ्यासक्रम मंडळ पुणे यांनी कथा या घटकावर विवेचन पूर्ण मार्गदर्शन केले. गद्य या घटकावर डॉ शालिनी तेलरांधे नागपूर यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. उपयोजित मराठी या अभ्यास घटकावर डॉ विठ्ठल चौथाले गडचिरोली यांनी मार्गदर्शन केले. व्याकरण या महत्त्वपूर्ण घटकावर डॉ सुधीर रायपूरकर नागपूर यांनी सखोल मार्गदर्शन केले. या सत्राचे संचालन प्रा. मारुती मुंडे वरोरा यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. सरिता कंचेवार चंद्रपूर यांनी केले.तिसऱ्या सत्रात खुले अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. खुले अधिवेशनाचे अध्यक्ष प्राचार्य धर्मराज काळे गडचांदूर तर प्रमुख अतिथी म्हणून सुरेश नखाते नागपूर, यश पवार यवतमाळ ,विजया मने गडचिरोली , संजय लेनगुरे भंडारा, डॉ राजेंद्र सोनवणे जालना आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित . होते. खुल्या अधिवेशनात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. या अधिवेशनात विविध ठराव घेण्यात आले. त्यात प्रामुख्याने महाराष्ट्रात वर्ग बारावीपर्यंत सर्व विद्या शाखेत मराठी हा विषय अनिवार्य असावा. शिक्षकांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यात याव्या. नवीन शैक्षणिक धोरणात मराठी विषयासह मातृभाषेतून शिक्षण दिले जावे. मराठीला अभिजीत भाषेचा दर्जा दिला जावा, आणि अशा प्रकारच्या राज्यस्तरीय अधिवेशनाला शासनाकडून अनुदान दिले जावे. आदी अनेक ठराव एक मताने घेण्यात आले.या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनात राज्यातील विविध जिल्ह्यातील प्रतिनिधी शेकडोच्या संख्येत उपस्थित झाले. हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी सुनील डिसले राज्याध्यक्ष , प्रतिभा विश्वास उपाध्यक्ष , बाळासाहेब माने सचिव, संपतराव गरजे कार्याध्यक्ष , डॉ ज्ञानेश हटवार चंद्रपूर जिल्हा प्रतिनिधी , डॉ सुधीर मोते जिल्हाध्यक्ष चंद्रपूर , गजानन सातपुते देविदास सालवटकर , प्रमोद बेलेकर, नरेंद्र विखार, किशोर ढोक, विनय दडमल, नामदेव मोरे , राजू केदार , ग्यानिराम गहाणे, देवेंद्र प्रधान, नंदकिशोर काकडे, रेणू देशकर,संजय मुंडे तसेच जिल्हा कार्यकारिणी ,तालुका कार्यकारिणी, मराठी विषय शिक्षक महासंघ चंद्रपूर यांनी केले

# नाशिक जिल्ह्यातील ५० अधिकाऱ्यांचार जिल्हा स्मार्ट ग्राम बिबी येथे अभ्यास दौरा



**कोरपना । प्रतिनिधी**

राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान २०२३-२४ अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सीईओसोबत ५० पदाधिकारी, अधिकारी, ग्रामसेवक व सरपंच मंडळींनी शनिवारी जिल्हा स्मार्ट ग्राम बिबी येथे अभ्यास दौरा केला असून विविध उपक्रमांची पाहणी करुन विकासकामांची प्रशंसा केली.

नाविन्यपूर्ण ग्राम पंचायतींना भेटी देऊन अभ्यास करण्याकरिता नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी महसुली विभागाबाहेर ग्रामपंचायतीचा अभ्यास दौरा करण्यासंदर्भात नाशिक जिल्हा परिषदेची आराखड्यात तरतूद केली होती. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील उपक्रमशील स्मार्ट ग्राम बिबी येथे दौरा आयोजित करण्यात आला.जिल्हा स्मार्ट ग्राम बिबी येथे विद्यापीठ आपल्या गावी, बांबू प्रकल्प, वनपंचायत, पाणी पुरवठा योजना, गावातील पायाभूत सुविधा व गावाशी संबंधित इतर गोष्टींचे अवलोकन केले. यावेळी अमरावती जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) डॉ. वर्षा फडोळ, नाशिकचे जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे, चंद्रपूरच्या जिल्हा आरोग्य अधिकारी अशोक कटारे यांच्यासह ५० पदाधिकारी, अधिकारी, ग्रामसेवक व सरपंच उपस्थित होते. उपसरपंच प्रा. आशिष देरकर यांनी गावात केलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली व गावाचा प्रवास समजावून सांगितला. सरपंच माधुरी टेकाम, ग्रामविकास अधिकारी धनराज डुकरे यांच्यासह गावातील नागरिकांचा यावेळी मोठा सहभाग होता.

**बिबी गावातील सांडपाण्याचे अतिशय सुंदर नियोजन करण्यात आले असून प्रत्येक गावाने सांडपाण्याचे असे नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच गावकऱ्यांचा लोकसहभाग वाखाण्याजोग आहे. प्रत्येक कुटुंबाने परसबाग फुलवली असून गावाच्या सौंदर्यात भर पाडली आहे. गावाचे करावे तेवढे कौतुक कमी आहे.
- डॉ. वर्षा फडोळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) नाशिक**

# मुल मध्ये उभे राहणार १०० खाटांचे अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय

## ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नामुळे १०७ कोटी २९ लक्ष मंजूर

**मूल । प्रतिनिधी**

जिल्ह्यात आरोग्याच्या उत्तमोत्तम सुविधा असाव्यात, येथील रुग्णांना उपचारासाठी नागपूर, मुंबईच्या चकरा माराव्या लागू नये तसेच स्थानिक स्तरावरच रुग्णांना अत्यल्प दरात आरोग्याच्या अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार नेहमीच प्रयत्नशील असतात. याच अनुषंगाने मुल येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यासाठी मंत्री मुनगंटीवार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना यश प्राप्त झाले असून मुल येथे आता १०० खाटांचे अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय उभे राहणार आहे. यासाठी शासनाने १०७ कोटी २९ लक्ष रुपयांच्या प्रशासकीय मान्यतेला मंजुरी दिली असून तसा शासन निर्णय जारी केला आहे.



सद्यस्थितीत मूल येथील उपजिल्हा रुग्णालय ५० खाटांचे आहे. या रुग्णालयाचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यासाठी पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे आता मुल येथे १०० खाटांचे नवीन उपजिल्हा रुग्णालय स्थापित होणार आहे. सदर रुग्णालय हे तळमजला आणि त्यावर तीन माळे असे एकूण १५ हजार चौ. मीटरवर तर वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचा-यांसाठी ४ मजली निवासस्थान राहणार आहे. तसेच १०० खाटा करिता लागणारी नवीन पदनिर्मिती या रुग्णालयासाठी करण्यात येईल. यामध्ये नेत्रतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, अस्थिरोगतज्ज्ञ, सर्जन, भूलतज्ज्ञ आणि इतर वैद्यकीय अधिकारी अशी एकूण १४ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे निर्माण होतील. सोबतच चतुर्थ श्रेणी कर्मचारी, परिचारिका, तांत्रीक पदेसुद्धा पदे निर्माण होतील.

## शिवणी वनपरिक्षेत्रातील रोखलेखा खर्च प्रमाणकेची सखोल चौकशी करा-दत्तात्रय समर्थ यांची मागणी

**मूल । प्रतिनिधी**



चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही तालुक्या अंतर्गत येत असलेल्या शिवणी वनपरिक्षेत्रातील रोखलेखा खर्च प्रमाणकेची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी चंद्रपूर जिल्यातील सामान्य कामगार सेवा चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष तथा जिल्हा औद्योगिक क्रांति कॉग्रेस सेलचे शहराध्यक्ष दत्तात्रय समर्थ यांनी केली आहे. दरम्यान समर्थ यांनी या संदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कडे एक लेखी निवेदन सादर केले आहे. शिवणी येथील मुरलीधर गायकवाड यांनी समर्थ यांच्या कडे सदरहू तक्रार सादर केली होती. त्या अनुषंगाने समर्थ यांनी चौकशीची मागणी केली आहे. उपयोक्त प्रकरणात सखोल चौकशी केल्यास गैरव्यवहार उघडकीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही असे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुरलीधर गायकवाड यांचे म्हणणे आहे.या बाबतीत त्यांनी देखील वरिष्टांकडे तक्रार दाखल केली आहे.

# ना.धर्मराव आत्राम यांच्या हस्ते विकास कामांचे भूमिपूजन

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील मुख्य रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरणासह सुधारणा करण्यासाठी कोट्यवधींची निधी मंजूर झाले असून नुकतेच अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्याहस्ते भूमिपूजन करण्यात आले.यामध्ये बोटलाचेरू फाट्यापासून आलापल्लीकडे पुढे ४ किलोमीटरचे काम केले जाणार असून यासाठी १९९.३७ लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.दुसरे काम मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून नवेगाव ते आपापल्ली ते चिंतलपेठ ९.४० किलोमीटर पर्यंत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात येणार असून यासाठी तब्बल ५९०.०० लक्ष रुपयांची निधी मंजूर झाले आहे.तर याच परिसरात तिसरे काम ९७.८० लक्ष रुपयांच्या निधीतून नवेगाव ते किष्टापूर (१.७९ किलोमीटर) रस्त्याचे डांबरीकरण काम केले जाणार आहे.सर्व कामांचे टेंडर पूर्ण झाले असून लवकरच कामाला सुरुवात होणार आहे.कोट्यवधींच्या निधीतून नवेगाव,किष्टापूर आणि वेलगुर या तिन्ही गावातील मुख्य रस्ते



गुळगुळीत होणार आहे.सदर रस्ते विकास कामामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून भूमिपूजन निमित्य ना .धर्मराव बाबा परिसरात दाखल होताच गावातील नागरिकांनी मोठ्या जल्लोषात ढोल ताश्यांच्या गजरात फटाक्यांची आतषबाजी करत जंगी स्वागत केले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष ऋतुराज हलगेकर, किष्टापूरचे उपसरपंच पवन आत्राम,राष्ट्रवादी काँग्रेसचे अहेरी तालुका अध्यक्ष श्रीनिवास वीरगोनवार,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष स्वप्नील श्रीरामवार, सामाजिक कार्यकर्ते अरुण मुक्कावार,जेष्ठ नागरिक श्रीकांत मद्दीवार, मनीषा सडमेक,वेलगुर टोल्याचे, सडमेक महाराज ग्रा.सदस्य रोहित गलबले,जेष्ठ नागरिक राजेश्वर उत्तरवार,ग्रा प सदस्य वामन मडावी,आशण्णा दुधी,आदिल पठाण,अरविंद खोब्रागडे,बाबुराव सोनूले,आलापल्लीचे ग्रा प सदस्य मनोज बोल्लूवार,ग्रा प सदस्य पुष्पा अलोने,ग्रा प सदस्य सोमेश्वर रामटेके,सार्वजनिक बांधकाम विभागाचे व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे अधिकारी तसेच नवेगाव,किष्टापूर आणि वेलगुर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .